**महाराष्ट्र शासन**
**शिक्षण सहसंचालक (उच्च शिक्षण)**
**१७ डॉ आंबेडकर रोड, पुणे विभाग,पुणे-१**

फोन नं.०२०-२६१२७८३३/२६०५१६३२ E_mail ID- jdhere@dataone.in फॅक्स नं. ०२०-२६१२७८३३

जा.क्र.शिससं/उशि/पुवि/आदेश/०७/२०७५०  दिनांक- ०६ / ०९/२००७.

1 8 SEP 2007

प्रति,

प्राचार्य,
पुणे विद्यापीठाशी संसलग्नित सर्व कला, वाणिज्य
विज्ञान, विधी व शिक्षणशास्त्र महाविद्यालये,
**पुणे / अहमदनगर व नाशिक जिल्हे.**

विषय- **अशासकीय महाविद्यालयातील शिक्षकेतर कर्मचा-यांना सेवाजेष्ठतेनुसार पदोन्नती देण्याबाबत..**

संदर्भ- १. मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे १ यांचे पत्रक क्रमांक अशाम/२००७/संघटना/मवि-२/५४८१ दिनांक ६.८.२००७.
२. शिक्षकेतर कर्मचारी प्रमाण संहिता नियम १९८४ (३) बढती स्वरुप व पात्रता पोट कलम (III) वर्ग तिसरा.

आपल्या महाविद्यालयातील शिक्षकेतर कर्मचा-यांसाठी सेवाशर्ती नियम (स्टॅण्डर्ड कोड) दिनांक १.५.१९८५ पासून अमंलात आले आहे. तत्पूर्वी संबंधित विद्यापीठांनी परिनियमाद्वारे केलेल्या सेवाशर्ती विषयक नियम शिक्षकेतर कर्मचा-यांना दिनांक १.५.१९८५ पूर्वी लागू होते आणि शासनाने सुध्दा परिपत्रक काढून असे आदेश दिले होते की, अधीक्षक पर्यंतची पदे गुणवत्ता व सेवाजेष्ठतेनुसार म्हणजेच अधीक्षक, लेखापाल, मुख्य लिपीक, वरिष्ठ लिपीक, वरिष्ठ सहाय्यक इ. पदे भरली पाहिजेत. तसेच वर्ग-२ मधील प्रबंधक पदावरसुध्दा व्यवस्थापनाचे एकच महाविद्यालय असेल तेथील पद सुध्दा सेवाजेष्ठतेनुसारच भरणे अत्यावश्यक आहे. परंतु ज्या व्यवस्थापनाचे दोन किंवा त्यापेक्षा अधिक महाविद्यालये असतील तेथील प्रबंधक पद भरत असतांना ५० टक्के सेवाज्येष्ठता व गुणवत्तेनुसार व ५० टक्के पदे खुल्या जाहिरातीद्वारे भरणे आवश्यक आहे. असे स्पष्ट आदेश शासनाने वेळोवेळी निर्गमित केले आहेत. तरी सुध्दा महाराष्ट्र राज्य महाविद्यालयीन शिक्षकेतर कर्मचारी महासंघाने असे निदर्शनास आणून दिले आहे की, या सर्व नियमांचे पध्दतशीररित्या काही प्राचार्य व संस्थाचालक उल्लंघन करीत आहेत.

काही महाविद्यालयाचे प्राचार्य व संस्थाचालक स्वत:च्या सोईनुसार कनिष्ठ असणा-या कर्मचा-यांना प्रबंधक व अन्य पदावर पदोन्नती दिली आहे. यावर असे आदेशीत करण्यात येते की, ज्या महाविद्यालयात अशा स्वरुपात शासनाच्या नियमांचे उल्लंघन करुन वरिष्ठ कर्मचा-यांची सेवा डावलून कनिष्ठ कर्मचा-यांना पदोन्नती दिली आहे अशा कर्मचा-यांचा पगार त्वरीत थांबविण्यात यावा. जर असे नियमबाहय पदोन्नती आपल्या महाविद्यालयात दिली असेल अशा प्रकरणांना दिलेली पदोन्नत्या रद्द करण्यात येत आहेत. तसेच यापुढे नियमांचे उल्लंघन होणार नाही याची दक्षता प्राचार्यांनी घ्यावी. या आदेशाचे जे प्राचार्य पालन करणार नाहीत अशा प्राचार्यांचा पगार थांबविण्यात येईल याची दक्षता घ्यावी.

सहसंचालक, उच्च शिक्षण
पुणे विभाग, पुणे

प्रत - श्री. जी.एस. पाठक, अध्यक्ष, पुणे विद्यापीठ महाविद्यालयीन शिक्षकेतर सेवक संघटना, द्वारा - हुतात्मा राजगुरु महाविद्यालय, राजगुरुनगर ता. खेड जि. पुणे.